# जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे

**दि. १४/०६/२०२४**

## निविदा सुचना

जिल्हा न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिपत्याखालील कल्याण, पालघर, वसई, भिवंडी, उल्हासनगर येथील न्यायालयांमधील कॅनॉन कंपनीचे एलबीपी १५१ डी डब्लू (Canon LBP 151 DW) तसेच कॅनॉन १६१ डी डब्लू (Canon LBP 161 DW) प्रिंटरची दुरुस्ती करण्याकरीता स्थानिक सेवा पुरवठाधारांकडून निविदा/दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तरी इच्छुक सेवा पुरवठादारांनी दि. २१/०६/२०२४ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे नावे निम्नलिखित पत्त्यावर बंद लखोटयात निविदा दरपत्रक सादर करावयात.

ज्या सेवा पुरवठादारांची निविदा/दरपत्रक स्विकृत केली जाईल त्या पुरवठादाराने सोबत जोडलेल्या प्रपत्र - १ मधील नमूद तालुक्यांमध्ये जावून प्रिंटरची दुरुस्ती करणे बंधनकारक राहील. तसेच जोडलेल्या सर्व अटी व शर्ती संबंधीत पुरवठादारांवर बंधनकारक असतील. तसेच प्रपत्र - २ मधे नमूद केलेप्रमाणे दरपत्रक देणे बंधनकारक असेल.

**पत्ता - जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे**
**कोर्टनाका, ठाणे प. पीन ४००६०१**

सदरबाबत अधिक माहिती घेणेसाठी सहा. अधिक्षक, रोख व वित्त विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे यांचेकडे कामाच्या दिवषी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० या कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. दि. २१/०६/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजल्यानंतर प्राप्त झालेल्या निविदा/दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. तसेच निविदा स्विकृत करण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार सर्वस्वी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचा राहील.

हुकूमावरुन,

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
ठाणे

ठाणे
दि. १४/०६/२०२४

SESSIONS COURT
THANE

## प्रपत्र - १

| Taluka | No. of Printers |
|---|---|
| Palghar | 3 |
| Belapur | 2 |
| Vasai | 5 |
| Kalyan | 8 |
| Bhiwandi | 3 |
| Ulhasnagar | 4 |
| Thane HQ | 5 |
| **Total** | **30** |

## प्रपत्र - २

| Issues | Reparing /Servicing Rates Per Printer |
|---|---|
| Fuser Fixing Issue | |
| Drum Unit Problem | |
| Page Pickup Issue | |
| Roller Broke | |
| Duplex Print Issue | |
| Paper Jam Issue | |
| Print Quality Issue | |

## अटी व शर्ती

१. सेवा पुरवठाधारकांनी संबंधीत तालुक्यामध्ये जावून प्रिंटरची दुरुस्ती करणे बंधनकारक असेल. तसेच दुरुस्त केलेला पिंटरबाबत कमीत कमी तीन महिने तांत्रिक दोष उद्‌भवणार नाही याची हमी देणे बंधनकारक असेल.

२. सेवा पुरवठाधारकांना प्रिंटरची दुरुस्ती संबंधीत तालुक्यातील सर्व्हर रुम मध्येच करणे बंधनकारक असेल. कोणेतेही प्रिंटर न्यायालयाबाहेर घेवून जाता येणार नाही.

३. प्रिंटरमधील कोणेतेही पार्टस बदलण्यात आल्यास जुने पार्टस संबंधीत तालुक्याचे तालुका संगणक प्रणालीकार यांचेकडे जमा करणे बंधनकारक असेल.

४. ज्या सेवा पुरवठाधारकांची निविदा / दरपत्रक स्विकृत केले जाईल त्यांना दहा दिवसांचे कालावधीमध्ये सदरचे सर्व प्रिंटरची दुरुस्ती करुन देणे बंधनकारक असेल.

५. प्रिंटरची दुरुस्ती झालेनंतर तालुका संगणक प्रणालीकार यांचेकडून प्रिंटर व्यवस्थित चालत असल्याबाबतचा अहवाल जिल्हा न्यायालयास प्राप्त झालेनंतरच एकत्रित देयक अदा करण्यात येईल.

६. सेवा पुरवठाधारकांनी दरपत्रकामध्ये सर्व्हीस चार्ज, स्पेअर पार्ट्स तसेच सर्व करांसहीत दर नमूद करणे आवश्यक आहे.

७. सेवा पुरवठाधारकांना संबंधीत कामाचा अनुभव असणे बंधनकारक असून प्रिंटरची दुरुस्ती करण्यासाठी ज्या कर्मचा-यांची नेमणूक करण्यात येईल त्यांची नावे देणे बंधनकारक असेल.